म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४८३



# रंग

मंगळवेढेकर राजा

REFBK-0014232
REFBK-0014232

# रंग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७६६५ वि: काव्य
क्रमांक १४८२ नों: दि: १८/१२/६

REFBK-0014232

14232

राजा
मंगळवेढेकर

गो. य. राणे प्रकाशन

प्रकाशक :
गो. य. राणे
गो. य. राणे प्रकाशन
८ कसबा पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : ३० सप्टेंबर, विजयादशमी, १९६०
मूल्य दोन रुपये

मुखपृष्ठ : दत्ता महाबळेश्वरकर

मुद्रक :
चिं ग. वझे
साधना प्रेस
४३०-३१ शनवार, पुणें २.

ती. स्व. काका

आणि

सौ. काकू

यांना

— राजा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि.

# रंग

लाल चुटुकशी माती
वेल हिरवी शेलाटी
जळ अभ्रकी निर्मळ
हंसे फेनिल धवल

निळी आभाळाची छाती
चंद्र रजताची कांती
शेत पोसलें पोपटी
दाणा मोतियाची उटी

दूर डोंगर जांभळा
गोड कुहू काळा गळा
फुटें क्षितिज जास्वंदी
रंगे मनोमनीं मेंदी

धुकें बिलगें दुधाळ
पाणी पांघरी शेवाळ
रंगबावऱ्या लहरी
रंगगर्भाच्या पुष्करीं

रंग रंग फुलांवर
रंग पंखापंखावर
रंग तनूमनावर
रंग अवघा विश्वंभर

रंग उतट दिशांना
रंग अवीट स्मृतींना
रंग रुसवा अबोली
रंग प्रीतीचा मखमली

१२२३८

रंग खाणाखुणांतहि
रंग रस स्मितांतहि
रंगभोळी शपथहि
रंगखुळी नजरहि

रंग ढंग चालण्यांत
रंग दंगहि तंद्रींत
रंग रंगीली दुनिया
रंग ब्रह्म, रंग माया

रंग पुण्याची झळाळी
पाप रंगें खोल तळीं
रंग मैफल नटली
पेठ रंगांची फुटली

भगवा भक्तीचा दिवाणा
खळीं गुलाबी उखाणा
रंगशीळेवरी ध्यान
रंगभूमीवरी तान

रंग गोरी गोरी राधा
कृष्ण सांवळीच बाधा
गौर उदास दिवस
शाम छटाहि रात्रिस

रंग रंगणीं रंगतो
रंगपंचमी खेळतो
रंग गीतांत राहतो
रंग बेरंगीं जागतो

रंग प्रलयाच्या दिठीं
रंग सृजनाच्या मिठीं
रंग प्राणाचीं हीं नातीं
रंग अमर ही माती

रंग पूर जगावर
रंग रंग अनावर
स्थिति, उत्पत्ति नि लय
रंग शाश्वत अक्षय !

* *

## तें नवल

त्या काळ्या सोज्वळ
मातीवरतीं
मी हरखुन नवल पाहिलें हिरवें

त्या भोळ्या कोमल
वाऱ्यावरतीं
मी चमकुन नवल ऐकिलें गहिरें

त्या काळ्या सोज्वळ
मातीवरतीं...
त्या भोळ्या कोमल
वाऱ्यावरतीं...

तें नवल आपुल्या वेळावुन हिरव्या माना
मज दावित होतें उकलुन गूढ उखाणा !

* *

## थंड प्रफुल्ल सकाळीं

थंड प्रफुल्ल सकाळीं
ताज्या प्रसन्न मनानें

घोट गरम चहाचा
घ्यावा मजेनें मजेनें

पुनः पुन्हां हळुवार
थोडी घालीत फुंकर

वाफ कढत सेवावी
मादकशी ऊबदार

आणि रात्रीं पापणीच्या
पिसाखालीं ठेवलेलें

स्वप्न चाळवावें पुन्हां
अर्धें मुर्धें गुंफलेलें !

* *

## रहस्य

कसे रंगले असतिल इवले
देठ निराळे
बकुळ फुलांचे !

कसें थरारुन वर्तुळ गेलें
लाडिक विभ्रम
करित जळाचें !

कसें निरागस तृप्त सानुलें
स्फटिक बिलोरी
मौन दंवाचें !

कसें किनाऱ्यावरतीं हंसलें
गूज पांढरें
फेन–फुलाचें !

कसें कळावें रहस्य असलें
निगूढ–कौतुक
तुझ्या कृपेचें !

* *

# गढूळ तांबुस

गढूळ तांबुस पाण्यासंगें
भरलेल्या ओढ्याच्या कांठीं
खडकावरतीं बसुनि कराव्या
मनांतल्या प्रिय मनच्या गोष्टी

स्वैर जरासें व्हावें जावें
लहरत लहरत जलकण बनुनी
कांहिं तरावें कांहिं फुटावें
इंद्रधनूच्या रंगांमधुनी

जातां जातां कुठें करावी
अवखळ खोडी रानफुलांशीं
कमानींतुनी बात करावी
भव्य शिलांच्या स्तब्ध पुलाशीं

आणिक वाहत वाहत गावें
अक्षय गाणें संथ गतीचें
कल्पनेंतल्या निळ्या लयीचें
अन् सृजनांतिल अमरपणाचें

* *

## सुखस्वप्न माझें

सुखस्वप्न माझें आहे
अस्पष्टशा उषेपरि
थोडें उजळ, अंधुक
रंगरेषा संध्येपरी !

चांदण्यांत कालवलें
ऊन तिथें सदा पडे
शुभ्र पारिजातकाचा
तिथें नित्य सडा पडे !

संथ निळ्या तळ्यामधें
शुभ्र हंस पोहताती
रसगंध कमळणी
डोकावती उमलती

आणि कांठावर थोडे
पलीकडे बाजूलाच
रंग पाचूची ल्यालेली
उभी बंगली माझिच

आणि तिच्या बाहेरच्या
मुक्त मस्त दालनांत
रिक्त मनानें टाकावें
अंग आरामखुर्चीत

किणकिण बिल्वरांची
आंतुन ये ऐकायाला
खेळ लाटांचा पाहावा
गंधवायू हुंगायाला

कधीं मोजीत चांदण्या
आभाळांत भटकावें
कधीं तोडीत कमळें
हंसामागें लहरावें

पश्चिमेच्या रंगांतून
डोळे भरून घ्यावेत
प्रभातीची कोंवळीक
अशा ओळी लिहाव्यात ...

* *

# दक्षिण वारा

ओल्या धुक्यांतून थंड
दक्षिणेचा आला वारा
आणि साखरझोंपेंत
मिसळल्या दुग्धधारा !

दक्षिणेचा आला वारा
ओठीं कळ्यांचे निःश्वास
गूज रात्रीचें गहिरें
नवा घेऊन उल्हास !

दक्षिणेचा आला वारा
कुजबुज चाहुलीची
मधाळशा अद्‌भुताची
नव्या भव्य घडणीची !

दक्षिणेचा आला वारा
त्याचा परीसाचा स्पर्श
जड कल्पनांना मनीं
होय कांचनाचा हर्ष

दक्षिणेचा आला वारा
गोड घेऊन तीव्रता
त्यांत यौवनाची नव्या
स्फुरे अस्फुट आर्तता !

दक्षिणेचा आला वारा
साज नव्या सौंदर्याचा
दालनांत घोटाळत
वास दिव्य सुगंधाचा !

दक्षिणेचा आला वारा
त्यांत ओढ जीवनाची
स्वप्नें सोनेरी मनींचीं
वास्तवांत जगण्याचीं !

दक्षिणेचा आला वारा
त्यांत नवें कुतूहल
धवलल्या सुषमेची
विरे धुक्याची ती शाल !

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ................. वि: .................
क्रमांक ... ................. नों दि: ...............

## आतां

आतां झोंप झांवळ्यांना
आहे लागलेली छान
पांढुरक्या ढगानेंहि
आहे टाकलेली मान !

कलंडला आहे वारा
उंबराच्या झाडावरी
ठिबकतो आहे पारा
आतां कळ्यांचिया उरीं

तंद्रींतच आहे आतां
भोळी भाबडी ही वाट
आणि सुटलेली आहे
दोन मनांतील गांठ !

* *

# वेड

आकाशानें दिलें निळाईचें दान
मनानें लाविलें पंखांचें निशाण

मृत्तिकेनें दिली सृजनाची कळ
पाठीनें साहिला आसुडाचा वळ

जळानेंच दिली प्रवाहाची गति
ओठांनीं गाईली जीवन-आरती

प्रकाशानें दिलें संहाराचें बळ
डोळ्यांनीं न्हाणिला करुणेचा तळ

वाऱ्यानें या दिली वादळाची ओढ
पायांनीं लाविली भिंगरीची जोड

पंचभूतांनीं या पुरविलें कोड
' अमृताचे हात '—अपुरेंच वेड !

* *

## खळाळून वाहे ओढा

काळ्याशार आभाळांत
घन श्रावण गर्जती
ओपुनिया जीवधारा
वसुंधरा नटवीती !

गांवकुशीचा लाडका
अंग अंग मुरडीत
खळाळून वाहे ओढा
गात गुंगून तालांत !

भर त्याचा ओढ त्याची
मन–तटांत मावेना
मस्त संगीत ऐकून
एके जागीं राहावेना !

शुष्क माळहि हांसतो
हिरव्या गालांतल्या गालीं
उडे मनांत पांखरूं
मोरपंखी सोनसळी !

* *

## हळूंच कांहींसें

हळूंच कांहींसें
कानांत बोलला
चावट वारा

त्यानेंच मनांत
थरंगळला
चंचल पारा

क्षणांत गेल्या
शिंपून धरणी
जीवनधारा

आणिक स्वरांस
तांबुस फुटला
कोंवळा धुमारा !

* *

## आंबा

सोसवेना झळ आतां
उग्र उन्हाची तापट
मंतरल्या भावनाही
होती अंमळ घामट

अशा राकट प्रहरीं
आंबा अष्टांगीं फुलतो
खट्ट्या-मिठ्या कैऱ्यांवर
कुरळा मोहर ढाळतो

उष्ण-चेंगटसा वारा
मधूनच डोकावतो
हिर्वा-कच्चा आंबा माझ्या
मनांतील पाडा येतो !

* *

## फूल उन्हाचें

फूल उन्हाचें
सकाळच्या तंद्रींत उमललें
वेत धुक्याचें
मनांतल्या शांतींत वितळलें !

शेत मक्याचें
सोनसळी शाळूंत लचकलें
हेत नदीचे
चमचमत्या वाळूंत मुरकले !

वाट वांकडी
चुकली होती तमांत वेडी
हिरवाळींतुन
निघे जावया...जवळच वाडी !

डोंगरमाथा
कळस तुऱ्यांनीं चमकत आहे
झूल जरीची
थंडीच्या शिरीं झुलतें आहे !

फूल उन्हाचें
फुललें होतें–फुलवित होतें
स्वप्न गुलाबी
संध्येच्या मनीं तरळत होतें !

* *

## आज

अंधार
होता भरून भंवती
नव्हतें
हालत झाडाचें पान
नीरव
स्तब्धता गोठून होती
पेंगला
बाजार टाकून मान
वेदना
होती झोंपली झोंपेंत
रेकत
नव्हतें कोठेंहि श्वान
कोटरीं
पंखांच्या मृदुल कुशींत
थिजलें
होतें आजचें गान

उजेडणाऱ्या उद्यांच्यासाठीं ?

* *

# असें वाटूं नये कधीं

असें वाटूं नये कधीं
कधीं खुंटावी ही वाट
—पाय व्हावेत हे धीट !

असें वाटूं नये कधीं
यावी भोंवळ उन्हास
—फुलो मोगरा उदास !

असें वाटूं नये कधीं
नीज जगावर यावी
—माझी जाणीव नुरावी !

असें वाटूं नये कधीं
पण
व्हावें असें कधीं मात्र
वाट चुकून सरावी
—तुझ्या संगतींत रात्र !

* *

# एक भुलावा

तुझे पोंवळ्याचें ओठ
रक्तचंदनाच्या टाचा
मेंदी झुरते हिरवी
लाल झाली मुकी वाचा !

जाईजुईच्या फुलांना
घेशी केसांत माळुन
काळा अंधार खोंवतो
माथीं चांदण्या भाळुन !

गोरी शेवंती लाजली
नीट लोभस देखणी
काया देखून केतकी
काढी मत्सरानें फणी !

तुझ्या शालीन डोळ्यांत
तुझ्या कुलीन स्मितांत
एक चुकावा भ्रमर
एक भुलावा दुष्यंत !

* *

## पीस

एक पांढरें शुभ्र मुलायम
पीस घेउनी हलक्या हातीं
असतांना तूं लिहीत कांहीं
फिरवावें तव मानेवरती

तंद्रींतुन तूं तुझ्या शहारुन
बोलावें मज कांहींबाहीं
राग तुझा अन् तसलें केवळ
ऐकायाचें पिसें मलाहि

* *

## वेंचित फिरते

वेंचित फिरते दुपारच्या या
शुभ्र अवेळीं फुलें लालसर
ज्यांच्यावरतीं सोनेरी जळ
करीत असतें अजून थरथर !

अजून माझे हात अधाशी
फुलें-फुलें मी किती खुडावीं
ओंचे भरले...भरली परडी...
परंतु ओंजळ ?...
रिति रहावी !

* *

## रात्र उभी

रात्र उभी मावळत्या सांजेच्या दाराशीं
चंद्र दूर चवथीचा चांदणीच्या माथ्याशीं

सुन्न उभीं झाडें हीं ढाळित मन मूकव्यथा
सुन्न वाट उत्कटशी बांधाच्या वळणाशीं

अर्धनेत्र मिटलेला, अर्ध उभा पापणिशीं
अंथरला श्वास अधिर कर्णफुलें पायाशीं

किरकिरला रातकिडा, तिष्ठलाहि येथ विडा
झटला बघ हा पतंग जळणाऱ्या ज्योतीशीं

ज्योत उभी, रात्र उभी, वाट मीच उत्कटशी
ओठंगुनि हांक तशी आर्त आर्त अधराशीं !

* *

## अघटित

ऐकलेंस ! पण पाहिलेंस का
फूल कधीं उंबरावर फुलतें ?

पाहिलेंस ! पण साहिलेंस का
भावफुलांतिल रहस्य जळतें ?

साहिलेंस ! पण बोललीस का
शब्दांच्या पलिकडला अर्थ ?

बोललीस ! पण रोंविलेस का
पाय कधीं करण्याला शर्थ ?

रोंविलेस ! पण अडविलेस का
चंद्रकरांचे शीतल अडसर ?

अडविलेस ! पण घडविलेंस का
विश्व हवें तें अस्फुट...धूसर ?

घडविलेंस तर फुलेल निश्चित
फूल तुझ्या उंबरावर अघटित !

* *

## पक्षी

संध्याकाळची कातरवेळ
पोसवलेली कुंवार केळ
ऊन-सावल्यांचा फिकट खेळ
सूर-शब्दांत नसतो मेळ

जाणवणारी मात्र चुटपुट
न कळणारी त्रयस्थ पुटपुट
अस्वस्थ क्षण, अस्वस्थ मन
उघड्या डोळीं पेटतें वन

ऊब नाहीं असें घरटें
विसरून नातें होतें उलटें
वाटूं लागतें एकटें एकटें
ऐल पैल कुणीच नसतें

मात्र असतो सोबत—साक्षी
हुरहुरणाऱ्या शून्य वक्षीं
कोरूं पाहातो प्रकाशनक्षी
माझा मी मतवाला पक्षी !

* *

## संभ्रम

भर उन्हांत आलिस
माळुन शेवंतीचा गजरा
अन् भ्रम पडला मज–
उन पिवळें, तूं पिवळी कीं शेवंतीचा गजरा !

लवली होती जुई अंगणिची
झुलली-झुकली जरा जराशी
खुडतां पानें दोनच तूं पण...
बघतच मी हा असा राहिलों
सरस कुणाचें
कळेच ना मज
दोघींतिल चंचल नाजुकपण !

किणकिणली महिरप
अस्फुट लाडिक तव अधरांची
आणि पसरला गंध स्मितांतुन...
खिळलों क्षणभर
उमज पडेना
सुगंध असला कुठून आला...
बकुल फुलांच्या निःश्वसनांचा
कीं किणकिणत्या अस्फुट, लाडिक
अधर फुलांचा ?

उधळित आलिस
मंथर, गहिरा नक्षत्रांचा
नेत्रोत्सव हा असा...
मी बनलों अन् झुरा बावरा
कळेचना मज
शिशीरांत या चैत्रोत्सव हा कसा ?

आलिस आणिक भरलें हें घर
भरला तूं मधुकोष अचानक
दुपारच्या या ऐन अवेळीं
स्तंभित मी तर पाहुन जादू...
कशी उन्हाच्या गालावरतीं
आज उमटली चंद्रम टिकली ?

* *

# आणि हांसता पिंपळ

चिमुकल्या जाईचा ग
वेल गेला कौलावरीं
शुभ्र चांदण्यांचीं फुलें
फुलतात घरावरीं

उंच झालीय बकूळ
गेला वठून मोगरा
इवल्या कर्दळीच्या माथीं
लाल फुलारला तुरा

केळ थोराडली आहे
लांब रुंद छान पान
बांध्यावर कण्हेरीची
उंच झाली किती मान

कधीं बोलतों, पाहतों
जुळवितों माझ्या मना
पुसटल्या रंगरेषा
निसटल्या खाणाखुणा

आणि हांसता पिंपळ
पानोपानीं सळसळ
कधीं येतें का ग ऐकूं ?
मनीं उठतें वादळ ?...

* *

# रिम्झिम् झेलत

रिम्झिम् झेलत माथ्यावर सर
घेत फिरावे निथळत ओघळ
चिकण मातिचा गंध ओलसर
हुंगत जावें पर्णांतिल जळ

दमट उन्हांतुन दाट धुक्यांतुन
हिरव्या हंसऱ्या गवत फुलांतुन
डबक्यामधल्या जळांत वांकुन
पाहात घ्यावें डेख खुडून

पांदीमधली वाट निसरडी
हळुंच ती उतरावी उतरण
रानफुलांचे गुच्छ करावे
आणिक द्यावें नंतर उधळुन

घोळवीत मग ओठांतुन शिळ
स्वैर फिरावें निथळत ओघळ
रिम्झिम् झेलत माथ्यावर सर
उगाच केवळ ! उगाच केवळ !

* *

# दोन लोचट नाचऱ्या

दोन लोचट नाचऱ्या
कळ्या कुंद मोगरीच्या
हंसताती मनांतून
मघांपासून कवींच्या

सकाळींच खिडकींत
आल्या पाहात वांकून
काय त्यांनीं ओळखलं
माझं छंदीफंदी मन ?

अशी कशी मीच बाई
नाहीं लाविली खिडकी
नाहीं सारिला पडदा
झोंप लागली डुलकी

द्वाड मुलखाच्या मोठ्या
आतां होईल बोभाटा
इथें बसून खुशाल
यांच्या वाऱ्यावर वाटा !

* *

# अमृताची आस

अमृताची आस
मनीं बरोबर
वागवी सत्वर सर्वकाळ

अमृताशिवाय
दुजा नाहीं ध्यास
एकच हव्यास सर्वकाळ

एकदां अमृत
जिभेवर आलें
थुंकून टाकलें लागलीच

अमृताची रुचि
ठावी कवणाशी
आमटींत मिशी बुडलेली

* *

# कक्षा

आहे निळें कुसुंबी धूसर वरतीं आभाळ
आहे दरडीच्यावर पहुडलेला मनांत झुरता माळ

आहे निश्चळ संतत पण अथांग डोहीं पाणी
आहे फुलें माळुनी कांठावरतीं झुकलेली वनराणी

आहे सुदूर डोंगरमाथीं सोनेरी नक्षी
आहे चिंवचिंवणारे दिशांदिशांतुन भिरभिरणारे पक्षी

आहे अलगुज घुमवित चित्त चोरटा वारा
आहे क्वचित एकटा निळाईंत वर लाजाळू तारा

आहे हवें, हवें तेवढें—अमाप एथें भिक्षा
आहे पण झोळीसहि माझ्या माझी आंखलेली कक्षा !

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..............

# हिरोशिमा

मृत्यूची फिरली मर्जी
तो कृतांतकाळहि हंसला बेहोषून
तें स्वप्न भयंकर
कल्पांताचें प्रलयकारी देखून

तें मृत्यू, जरा, घात, उत्पात
तें युद्ध, अवर्षण, रोग नि वाताहात
हीं विनाश अस्त्रें
खेळुनी उबगुनी गेला
हें रोजरोजचें...नित्याचेंच म्हणाला

अन् चिंतातुर असतांना
लागली असावी काळासहि हलकी डुलकी
अन् तें स्वप्न भयंकर
इतुकें कीं–थरकांपहि त्याचा व्हावा !

पण मृत्यूची फीरली मर्जी
स्फुरली त्याला नवी कल्पना कांहीं
अन् ती समूर्त करण्या
दिली मानवा ग्वाही !

तो मानव—कीं मानवरूपी काळ
जाहला पूर्ण सिद्ध तात्काळ
बुद्धि, प्रज्ञा अगतिक त्याची झाली
संहार रेखिला मानवतेच्या भाळीं !

त्या प्रयोगशाळा
सर्वार्थांनीं सिद्ध !
ज्ञानास्तव बसले तेथें
अणूयुगांतिल बुद्ध !

तो बुद्ध होऊनी गेला मानव-तारक
हे बुद्ध कष्टले होण्या मानव-मारक
—इतुकेंच क्षुद्रसें अंतर दोहोंमधलें
अस्तित्व ?...शाश्वती नाहीं
मग विचार करतां कसले ?

ना तरी बुद्ध तो वदला दुसरें काय ?
" हें जीवन आहे
क्षुद्र अशाश्वत फोल ! "
तो धडपडलाहि विश्वशांततेकरतां
अन् मानवतेच्या उन्नत मुक्तिकरतां

मग हे प्रयोग शाळेंतिल संशोधक बुद्ध
पटवीत नाहीं कां कृतीनें आपुल्या शुद्ध
कीं नश्वर आहे अवघें जीवन फोल
फेकतां तयावर फक्त एक अणुगोल !
अन् अहोरात्र हें बुद्धापरि श्रमलेहि
निर्मिली शांतता—जी स्मशानांतहि नाहीं !

मुक्ति ?
छेः ! ती नाहीं एकट्यादुकट्या
ती चराचराला अस्तित्वाला अवघ्या



रंग

मग बोला ?
अंतर्मुख होऊन सांगा
तो बुद्ध श्रेष्ठ कां
हा संशोधक मोठा बोला ?

अहो, त्या हिरोशिमोवर
चुणुक दाविली फक्त
ती नगरी – जीवन तिथलें
क्षणार्धांत उध्वस्त !

—ती कला मानवी
युगायुगांतुन जपलेली
—पावित्र्य, सुचीता, मंगल सात्वीकता
हीं चिरंतनाचीं शाश्वत मूल्यें सगळीं
—सत्यं, शिवं, सुन्दरम्
हें अक्षर वाङ्मय सगळें...
अन् संस्कृती ?
—ज्यांतुन मानव झाला हिमालयाहुन थोर !
अन् मानवतेचा महान् मंगल धर्म ?
हाय ! मानव ओढी मानवतेचें कर्म ! !

पण होती जागत
अंधारांतहि मिणमिणती पंती
होता निर्झर झुळझुळ वाहत
खडकाच्या पोटीं
होता सुवास भिजला रसांत
कळ्यांच्या ओठीं

होती हिरवी आशा
दग्ध भूमीच्या पोटीं
ती संहारावर मात कराया उठली
ती आवेशानें उफाळून मग नटली
ती फुंकर पडतां
तेवून गेली ज्योती
अन् पुन्हां गर्जली मानवतेची महती !

ती नगरी – तें जीवन —
—कला, संस्कृति, वाङ्मय–सगळें सगळें
तें पुनरपि नटलें – जगलें जगलें ! !

—हिरोशिमो !
तूंच मानवी निष्ठा
हिरोशिमो !
तूंच मानप्रतिष्ठा ! !

* *

## तुझें वेड दूर नाहीं !

कल्पनेच्या झेपेपेक्षांहि उंच अवकाश
पण तेंहि आतां थिटें झालें आहे.
अगम्य निळाईची भाषा
तीहि लिपीबद्ध होऊं लागली आहे.
ढगांचे लाडिक आणि रंगीत लोंकरी ससे
आतां माणसाळूं लागले आहेत.
उंच माडांची गर्वोन्नत मान
आतां लज्जेने खालीं झुकली आहे.
अजिंक्य पर्वताच्या शिरावर
पावलांच्या खुणा उमटल्या आहेत.
चमचमणाऱ्या चांदण्यांचीं गूजें
सहज उकललीं जात आहेत.
सौंदर्यखनी चंद्रावर
पाऊलवाट रुळूं लागली आहे.
अज्ञाताच्या अहंकाराला
विज्ञानानें नमविलें आहे.
अतर्क्य अशा आभाळाला
किनाऱ्याची मर्यादा पडली आहे.
अबोधाच्या पसाऱ्याला
ज्ञानाचा स्पर्श घडला आहे.
आणि आतां गूढरम्य उंचीला
उंचीच मुळीं उरली नाहीं,

म्हणून ख–पुष्प हुंगण्याचें तुझें वेड
मानवा ! अरे आतां मुळींच दूर नाहीं !

★ ★

# ज्या जगांत युद्ध नाहीं

ज्या जगांत युद्ध नाहीं
तें जग शुद्ध आहे !
ज्या जगांत शस्त्र नाहीं
तें जग पवित्र आहे !

त्या जगांत असेल दारिद्र्य
—रंक झालेलें
त्या जगांत असेल अज्ञान
—कोशांत दडलेलें

त्या जगांत असेल दुःख
—पोरकें झालेलें
त्या जगांत असतील रोग
—निर्वासित बनलेले

त्या जगांत असेल भय
—निर्भयतेला भ्यालेलें
आणि त्या जगांत असेल भूक
—भुकेजलेली शांतीची

त्या जगांत असेल इच्छा
—इच्छुक केवळ प्रीतीची
म्हणून त्या जगांत नसतील हात
—शस्त्रस्पर्धेत गुंतलेले

त्या जगांत नसतील पाय
—आक्रमणांत गढलेले
त्या जगांत नसेल बुद्धि
—संहारांत रमणारी

त्या जगांत नसेल वासना
—माणसाला विसरणारी

अशा जगाच्या निर्मितीची
आज आकांक्षा पालवली आहे
अशा जगाच्या अस्तित्वाची
आज भावना डंवरली आहे

ज्या जगांत तख्त नाहीं
तें जग मुक्त आहे
ज्या जगांत युद्ध नाहीं
तें जग शुद्ध आहे !

* *

## लवलेल्या पिकावर

लवलेल्या पिकावर
सळसळती लहरा
हले, डुले थोराडल्या
उंच कणसाचा तुरा !

घोटाळतो इथें वारा
लिंपुनिया पान पान
रानमाळ साधें भोळें
वश झालें तरारून !

गंध भरे रानोरानीं
गुरें मस्तींतहि आलीं
दाही दिशा परतून
झुकीं पांखरेंहि आलीं !

भरू आल्या कणसांत
फुटे मोती दाणादाण
मोसमांत अशा घोळे
मनीं हिरव्या उखाणा !

* *

# म्हणूनीया काळोखाला

ऊन होऊन रुळलों
अंग बिलोरसें छान
सूर होऊन खिळलों
गोड आकारित तान

कधीं उषेचें यौवन
वस्त्र लेऊनीया आलों
कधीं लाली संध्येची मी
धुंद होऊनीया प्यालों

कधीं सकाळ प्रसन्न
झालों दुपार प्रखर
कधीं चादण्यांचा मऊ
मऊ माळला पदर

तरी उरलीस थोडी
चार दशांगुळें जशीं
म्हणूनीया काळोखाला
वश झालों मी अधाशी

* *

## श्रावणांतली सकाळ

श्रावणांतली सकाळ भिजून येते चिंब
परसदारीचा असतो निथळत उभा निंब

मातीचें ओलेंपण आतां असतें सजलेलें
गर्भांतून हिरवें तण पुरतें असतें रुजलेलें

वाऱ्यालाहि असतो वेध अफाट वादळाचा
पाझरानें होतो भेद कठीण कातळाचा

ओली ओली हवा आणि सारेंच असतें ओलसर
ओल्या इच्छेभोंवतीच पडतात गळेसर

श्रावणांतली सकाळ भिजून येते चिंब
तिऱ्याहि मनांत असतें उन्हाचेंच बिंब !

* *

## माझा मीच

कधीं माझा मीच
असून नसतों
दुरून देखतों स्वतः माजीं

कधीं माझा मीच
नसून असतों
दुर्लक्षून जातों स्वतःकडे

* *

## ओढ

आकाशतें मन
पोंचें दिगंतरा
स्वप्नांत उंबरा दिसतसे

उंबऱ्याची ओढ
आहे आभाळास
धांव क्षितिजास सदां त्याची

* *

## पेशा

घणघण घणघण घंटा झाली
शाळा सुटली, मुलें पळालीं
डगागत्या त्या अधु खुर्चींतला
अधू मनाचा देह तो किडका

अवजड बेड्या कैक मणाच्या
लादुन घेउन अधू मनावर
चालूं लागला जीवन दुस्तर
गरिब बिचारा त्रिंबक मास्तर !

मार्गामध्यें त्यांना दिसली
आज अचानक गर्दि भयंकर
नजर खालची वळवुन तिकडे
त्यांनीं देखिलें भव्य थिएटर !

झगमग विद्युत झळकत होती
डोळे दिपले त्यांचे क्षणभर
आणि पाहतां सुंदर चित्रें
स्वैर उडालें मनीं कबूतर !

अबबबब ! तिकिटासाठीं रांग केवढी
मधें ओरडे गुलाबरेवडी
खमंग मसालेदार काकडी
गरम गरम ती भजी पकोडी !

क्षणांत त्यांचें मन भिरभिरलें
डोळे त्यांचे फिरून आले
' आज पाहुं या मस्त सिनेमा...'
मनहि त्यांचें गोड हुरळलें !

आणि पाहिलें पुन्हां सभोंतीं
तोंच लाजली रंगू न् रंग्या
शाळेची ती झाडूवाली
रंग्या नवरा करतो हमाली !

' पिक्चर पगण्या ' आले होते
रंगू नेसली कोरी साडी
आणि घातला कंबरपट्टा
रंग्या उडवी मलमल फेटा !

चरकुनी मास्तर स्वतः पाहती
स्वतःकडे अन् त्यांना दिसलें
शतगांठींचें धोतर काळें
कोट–नव्हें तो सारीं ठिगळें !

घामट टोपी डोकीवरची
हळुंच पाहतें बाहेर अस्तर
पांढुरकी ती दाढी सांगें
गरिब बिचारा त्रिंबक मास्तर !

कैक दिवसापासुन नाहीं
पायाला तो चप्पल साज
खवचट त्यांचें मन त्या म्हटलें,
' अनवाणी अन् अकडबाज ! '

आणि बरोबर नाहीं ' ती '...
' ती ' आठवितां धस्स जाहलें
लगबग करुनि तडक निघालें
मन त्यांचें तें घरांत गेलें !

तापानें ' ती ' होती विव्हळत
छबी उशाशीं उव्वा मारित
उंबऱ्यांतच तो गंप्या होता
हातावरची खरूज उकरित !

डबडीं भांडीं रिकाम पोटीं
उत्सुक चुल ती जळणासाठीं
रेशन पिशव्या आणि बाटली
खेंकसून त्यांच्यावर उठली !

मन तळमळलें अन् चुरचुरलें
अन् चरफडलें अन् तडफडलें
असा जिव्हारीं घाव बैसतां
तें अधू झालें, तें जड झालें !

भकास त्यांच्या डोळ्यांपुढतीं
रंग्या गेला फेटा उडवित
उदासतेची खपली काढित
रंगी गेली लाजत मुरकत !

आणि अचानक त्यांना दिसली
भव्य इमारत बांधायाची
तिथें उडाली होती झिम्मड
रोजकऱ्यांची, कामकऱ्यांची

क्षणांत त्यांना चाटुन गेला
विचार, जावें तिथें आणखी
काम करूनी मोजुनी घ्यावी
मजुरी आपुली दिवसांकाठीं !

खळखळलीं तीं पांढरीं नाणीं
डोळयांपुढुनी क्षणभर त्यांच्या
रंगू नि रंग्या तरळुन गेले
फेटा उडवित मखमालीचा !

' आपणहि जाऊं तिला बरोबर
छबी आणखी घेउन गंप्या...'
सुखद शिरशिरी अंगांगांतुन
सरकुन गेली, आणि परंतु...

परंतु आपण ?...आपण कोण ?...
आपले पूर्वज...आपले वंशज...
आपला दर्जा...आपला पेशा...
पेशा पेशा...पांढरपेशा...

मन चिरचिरलें तें हुरहुरलें
अन् गोंधळलें अन् गडबडलें
...पेशा...पेशा...पांढरपेशा...
पांढरपेशा...पांढरपेशा... ! !—

खवचट मन तें खदखद हंसलें
मन संस्कारी त्यां भेदरलें !
केंकाटत अन् मागें सरलें
पेशा ... पेशा ... पांढरपेशा ! !—

धोतर काळें, कोटहि मळका
होता अंगीं, त्यासम मनहि
डागळलेलें, सुरकुतलेलें
आणि तरीहि, पांढरपेशा ! !—

घेड्या अवजड कैक मणाच्या
लादुन घेऊन अधू मनावर
चालूं लागला जीवन दुस्तर
गरिब बिचारा त्रिंबक मास्तर !

* *

# प्रकाशवेडा

प्रकाशवेडा खरा परंतु
अंधाराला फितूर झालों
फुलावयाचें वेड खरें पण
मिटल्या कोषीं गुंतुन पडलों

मोह अथांगाचा गगनाचा
घरटें बांधुन छान राहतों
मुक्त, कलंदर, धुंद खरा पण
नीटनेटकें कुंपण रचतों

वासाचा उःश्वास स्वैर पण
कुपींत अत्तर हुंगुन घेतों
ध्यासाचा मी भास खरोखर
हव्यासाचा बळीच बनतों

अमर्यादसा हेतु हेरुन
जपतों मी पण मनीं किनारा
अपार्थिवाशीं नातें जोडुन
सेतू बनतों बघुनि निवारा

असण्या-नसण्यांतील असा मी
यात्रिक केवळ अगतिक फिरतों
असण्यांतिल कळ सोसुन घेउन
नसण्यांतिल बळ पंखीं भरतों !

* *

## आषाढ घनापरि

आषाढ घनापरि दयार्द्र होउनि यावें
तें बीज द्युतीचें जीवनांत पेरावें

प्रसवून गर्भ तो सोन्याचा उजळावें
हे मृण्मय अवघे जीवकळे फुलवावे

परिसरांत भरुनि गंध चंदनी व्हावें
तें सुखद चांदणें होउनि नित वर्षावें

मकरंद फुलांतिल होउनि अलि तोषावे
तृणपर्ण होउनि बरड माळ हंसवावे

ती लहर जळाची तृषिता शमवायाला
होऊन सांवली सुखवावे पांथाला

ते पुलक देवाचें होउनि नित हंसवावे
ती आशा अमरा दग्ध जीवनीं व्हावें

तें स्वप्न मनोहर व्हावें शतरंगांचें
जें कुणाकुणाला आहे तें जगण्याचें

ध्यानस्थ मुनीच्या तेज तपांतिल यावें
फुलवात निरांजनीं जळत तेज उधळावें

ऋतुचक्र होउनि विलसावें सृष्टींत
उपनिषद् बनूनी गावें गंभिर गीत !

* *

# चौकट

किलकिले होते डोळे
होती परि धीट दृष्टि
तेव्हां न्याहाळली होती
दिठीं–मिठींतील सृष्टि !

रांगतसे भुईवर
तेव्हां मुठींत आभाळ
चालतांना झोक जाई
झेली अल्लद पाताळ !

अजूनहि आठवते
रोधणारी चवकट
जिनें आंखुडति केली
पळणारी बाळवाट !

तेव्हांपासून जाहली
एक नभाची चौकट
तेव्हांपासून जमीन
स्तूं लागली बोथट !

आणि एका चौकटींत
विश्व माझें सामावलें
आजूबाजूला चौकटी
नभ दूर...दूर...झालें !

* *

## कुणासाठीं ?

कर्दळी पानांत
मौक्तिक माळून
झेंडूच्या फेट्याला
गेलीय् भाळून
गोऱ्या शेवंतीला
लाज न उरली
पारिजातकानें
मूठ उधळली
मोतीया कुलीन
मोगरी शालीन
मनांत हंसते
बकूळ माळीण
सायली नटली
सायासावीण
गुलाब फेकितो
मदन बाण
बोगनवेलीच्या
हिरव्या शेपटीं
जास्वंदी रिबिन्
खुलते मोठी
आणिक तिष्ठत
उंच पायावर
निशिगंध आहे
कुण्या मागावर ?
कुण्या मागावर ?...

* *

## पीक

आतां वारा पडला आहे
धारेचा जोर ओसरला आहे
रानांत पीक उभें आहे
टपोर दाणा भरला आहे
त्याचा गंध सुटला आहे
चुकलें पांखरूं परतलें आहे
रानभूल झाली आहे...
राख ग ऽ ऽ पोरी !

* *

# सर

अवचित येते पावसाची हलकीशी एक सर
तापून गेल्या मातीची तेवढीच निवते नजर

तेवढेंच होतें वादळ, तेवढेंच शिंपलेलें जळ
म्हातारलेल्या माळालाही तेवढेंच चढतें बळ

राकटलेल्या झाडाला तेवढेंच घडतें स्नान
बहरलेल्या मोगऱ्याच्या मनांत पिकतें रान

पिसावरच्या थेंबांनीं चिमण्या जातात हरकून
लबाड कावळे बघूं लागतात कांहीं तरी निरखून

बस्. एवढीच एक हलकीशी सर येते तशी जाते
जातां जातां आडोशाला थबकुन देखील राहाते !

* *

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# विसर

लहानपणचें सगळेंच आतां
कसें बरें आठवायचें
किती म्हणून चिमुकल्या
स्मृतीनें या सांठवायचें

विसरून गेलों छप्पापाणी
पिंपळाच्या पारावरची
विसरून गेलों राजाराणी
तिन्ही सांजेची तुळशीपुढची

भातुकलींतला चट्टामट्टा
तोहि विसरून गेलों आहे
मिरवणुकींतला नट्टापट्टा
पार विसरून बसलों आहे

त्याचवेळीं विसरण्याचीं
भांडणें आतां कशीं स्मरतिल
'अट्टीगट्टी'... 'अळिमिळी'...
प्रकार असले कुठून उरतिल

अग, मी परवांच पाहिलें
सहज चाखुन चिंचेचें बोटुक
पण शप्पत सांगतों आढळलें नाहीं
त्यावेळचें आंबट चेटुक

कैरीचाहि होतो खोकला
खट्टी–मिठ्ठी उरली नाहीं
पावसानें तर होतें पडसें
गार वारा सोसवत नाहीं

पण इवल्या इवल्या जिभेवर
एक गार वेंचलेली
स्मरते का ग ऽ तुला पण
कशी बरें विरघळली !

* *

# इथेंच असतो का ग वस्तीला

( लावणी )

ओंठावरतीं लालचुटुकशा जणूं अबीट हें मोहोळ झुलें
बोल तुझे ग अल्लड मैने! ऐकुन हृदयीं मध गळे!

नेत्र दोन हे भावुक हंसति जसे फुलांचे छान कळे
घडतां किमया तुझ्या दृष्टिची कुणाकुणाचा जीव उले!

कुणि न लावितां रसरंगाचे इथेंच पिकले कसे मळे
चंद्रानें का इथेंच अपुलें पसरियलें हें तेज खळें!

झुलतें यौवन, फुलतो श्रावण, उडति रुपाचे भुईनळे
जातां जातां वळुनि पाहतो मदनहि थोडें अळेंबळें!

इथेंच असतो का ग वस्तिला वसंत बारामास खुळे
रतिरंगाचा थाट माट अन् घाट इथें हा असा जुळे!

* *

# राजसा रंगला रंग

( लावणी )

राजसा रंगला रंग, गालिं नारिंग, नयनिचें भिंग,
रोखुं तुम्ही नका
हळदिचें पिवळें हें अंग, नका सारंग, भिजवुनि चिंब
टाकुं गडे फुका !

हा हिरवा हिरवा चुडा, अंगठिचा खडा
लालचुटुक पोंवळी ओठ, मुखामधिं विडा
घमघमे ज्वानी बहरांत कणिस केवडा
शेलाटी शेंग चवळिची, लचक कमरेची, न्याहाळुं नका–
जाणते भुका !

हे लांब लांबसर सुरंग कुंतल काळे
हे मीन जळांतिल लाजुनि पळवी डोळे
हे वक्षावरतीं मदन फुलांचे झेले
घेण्यास घेऊं नका झेप, बसा जरा चूप, कोमेजेल रोप—
जरा तरी ऐका !

नथ, बुगडी, टिक्का, ठुशी, गळसरी
दागिने तनूवर वसन लेतें भरजरी
लालभडक लाविते कपाळीं कुंकू चिरी
जाईन देवदर्शना, मनीं कामना, गडे मोहना—
बघा टकामका !

* *

# पूर

एखादी रात्र अशी येतें कीं सारेंच होतें दूर
सगळाच बदलुन जातो एकदम जगाचा या नूर

हितगुज करणारे घराचे कोपरे बनतात कसे क्रूर
आरामखुर्चीच्या पाठीचेहि खिळे होतात शूर

कडवट तिखट झोंबूं लागतो कसलासा धूर
कळत नाहीं पण जाणवत असतो कसला तरी सूर

स्नेहाळ उशी पण ऐकवुन टाकते स्वतःची कुरकुर
वेळ साधुन दिवाहि बेटा करूं लागतो फुरफुर

शेवटीं असतो अंधार, त्यांत व्हावें चूर
पण दाही दिशा भरून आज त्यालाहि येतो पूर

तळ गांठावा म्हणून मारतों तशांतहि सूर
पण अनावर असतो अंधाराचा काळाकुट्ट पूर !

* *

## स्वप्नें पण धीट हवीं

गुहेंत राहणाऱ्या आदिमानवानें देखील
पाहिली असेल स्वप्नांची आरास
बर्फांत फिरणाऱ्या हिममानवाच्या सुद्धां
असेल स्वप्नांची झालर सुरास !

युगामागून युगें गेलीं, स्वप्नें पण पडतच आलीं
स्वप्नांचीच केवळ सोबत साऱ्या मानवांना झाली
स्वप्नें होतीं त्यांचीं तीं–धूसर, मऊ, गुलगुलीत
ढगांसारखीं रंगीबेरंगीं, वाऱ्यावरचीं झुळझुळीत.
स्वप्नें होतीं त्यांचीं तीं—मोहक इंद्रधनुष्यांचीं
चमकणाऱ्या पात्यांचीं, आकारणाऱ्या मातीचीं
पण सारेंच होतें भासमय, मिथ्या, अनित्य...
आणि स्वप्नच मात्र होतें केवळ अखंड सत्य !

— या सत्याच्या ध्यासांनीं कांहीं श्वास पोळले होते,
— या स्वप्नाच्या पूर्तीसाठीं कांहीं आत्मे जळले होते.

आज त्या स्वप्न–सत्याचें पुराणबीज पोसलें आहे
खडकांतून पोलादाच्या अंकुरीत होत आहे.
आतां भविष्याची मूस ओतणाऱ्या स्वप्न–दृष्टीचीं
स्वप्नें पण धीट हवींत विद्युतगर्भी सृष्टीचीं !

* *

## आकांक्षांना आभाळ थिटें

आकांक्षांना आभाळ थिटें
आज्ञाताचा पट फिटे
अतर्क्य आतां कांहींच नाहीं
चढणीकडे जळ वाही !

कुत्रीं-माकडं पण थोर झालीं
अंतरिक्षांत जाऊन आलीं
अशक्य आतां बातच नाहीं
हिमालयाची होईल लाही !

गति केवळ हातांत आली
अवकाशाची शान जिरली
अवघड आतां उरलेंच नाहीं
समुद्रसुद्धां गोठूं पाही !

दहा दिशा, पण झाल्या निरर्थ
बुद्धीची केवढी प्रचंड शर्थ
विज्ञानाचा डोळा फुटला
गूढ सगळें उकलून बसला !

कालचें ज्ञान आज शिळें
हादरून गेलीं खोल मुळें
वेडापिसा झाला पारा
गंभीर बनला चंचल वारा !

सारें कसें व्यापक विशाल
आपुल्या हातीं आपुलें भाळ
' शांतीसाठीं अणूतंत्र '
जुळला आहे छान मंत्र !

फक्त जुळत नाहीं कृति नि शब्द
अन् बिचारी बुद्धि इथेंच स्तब्ध !

* *

## पहिली ठिणगी पडली तेव्हांच

पहिली ठिणगी पडली तेव्हांच अंधार जळला
भीषण युगांच्या गर्तेतला, पहाडांच्या गुहेंतला.
आणि प्रकाशाच्या पहिल्या पिवळ्या ज्योतीची
थरथरली होती रेखा पुच्छ आहे नाहीं मानवाच्या मुखावर.

त्या उजळण्यानें चमत्कारिक स्तंभित झाली गुहा नि दरी
आणि अंगावरतीं केस आहेत नाहींत मानवाला
दिसली होती आगळी वाट, स्वातंत्र्याची सोनपहांट
आकाशांत उडणाऱ्या पक्षांची भरारी अर्थपूर्ण झाली.

अर्थामागून अस्त्रें आलीं, शास्त्रें आलीं, आणि पुन्हां एकदां
झाला गुंता प्रगतीच्या टप्यावर–
आणि याच गुंत्यांतून काळोखली भावना.
स्वैर उडणाऱ्या पक्षाला मिळाला सुरेख पिंजरा !

पण पहिली ठिणगी पडली तेव्हांच अंधार जळला
आतां कोणीच नाहीं समर्थ–ती आदिम दिशा कवळायला.

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# झाड

९९२३२

झाड असतें मनमोकळें, ऐसपैस छंदीफंदी
झाड असतें मौनी देखील चिडीचिप फांदी फांदी

झाड असतें सडें फटिंग, मुक्त योगी कलंदर
झाड असतें घरंदाज मुलें बाळें खांद्यावर

झाड असतें घमेंडखोर, भारलेलें महत्त्वाकांक्षी
झाड असतें ठेंगणें ठुसकें सोज्वळ नि सर्वसाक्षी

झाड असतें झपाटलेलें गूढ गूढ भासणारें
झाड असतें उधाणलेलें खूप खूप हंसणारें

झाड असतें तुसडें आणि एकटें एकटें वागणारें
झाड असतें वांकडें पण चारचौघांत बसणारें

झाड असतें तऱ्हेवाईक आपल्यांतच रंगणारें
झाड असतें लाडिक देखील दुसऱ्यांना रंगवणारें

झाड असतें असें पुष्कळ—माणसासारखें वाटणारें
झाड असतें झाडच केवळ दुसरें कांहींच नसणारें!

REFBK-0014232
REFBK-0014232
मराठी ग्रंथ संग्रहा...
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........